जनसंपर्क कक्ष
07 DEC 2021
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# 'डॉ. आंबेडकरांना समजून घेण्यात भारतीय समाज कमी'

कोल्हापूर : ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेण्यात भारतीय समाज कमी पडला, म्हणूनच देशाची प्रगती खुंटली,'' असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य कुंभार म्हणाले, ''महामानवांची जातीजातींत विभागणी करून टाकली आहे. बाबासाहेब असोत की, फुले, शाहूंसारखे द्रष्टे नेते असोत, सामाजिक तळमळीचे कार्य करताना त्यांना अखिल भारतीय समाजाच्या कल्याणाची तळमळ होती. बाबासाहेबांचे वाचन करणे हा महत्त्वाचा मुद्दा आहेच, पण त्याचबरोबर त्यांना 'बिटविन द लाइन्स' वाचणे हा भाग खूप महत्त्वाचा आहे.''

केंद्राचे संचालक डॉ. एस.एस. महाजन म्हणाले, ''बाबासाहेबांच्या विचारांचा जागतिक पातळीवर फार मोठ्या प्रमाणावर स्वीकार झाला आहे. बाबासाहेब समजून घेण्याची ही प्रक्रिया निरंतर चालणारी आहे. त्यांच्या कार्याचे अनेक पैलू अद्यापही जगासमोर आलेले नाहीत. त्यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच त्यांच्या विचारांचे वाहक तयार करणे ही आजची खरी गरज आहे.'' प्राचार्य डॉ. कुंभार, डॉ. महाजन यांच्यासह उपस्थितांनी प्रतिमेस अभिवादन केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. डॉ. राजू श्रावस्ती, डॉ. सरदार सोनंदकर, डॉ. वाय. व्ही. धुपदाळे, आनंद खामकर आदी उपस्थित होते.

लोकमत

# राज्यभरातील महाविद्यालयांत ज्ञानेश्वर मुळे यांची व्याख्याने

लोकमत न्यूज नेटवर्क,
**गडहिंग्लज :** केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्यभरातील महाविद्यालयात सेवानिवृत्त अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांची व्याख्याने आयोजित करावीत, अशी सूचना राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलसचिवांना पत्राद्वारे केली आहे.

अब्दुललाट (जि. कोल्हापूर) येथील सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या डॉ. मुळे यांनी विविध देशात भारताचे राजदूत म्हणून काम पाहिले. अलीकडेच ते विदेश मंत्रालयाच्या सचिव पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. 'पासपोर्ट मॅन' म्हणून देशभर ओळखले जाणारे डॉ. मुळे हे कवीमनाचे प्रशासकीय अधिकारी व ख्यातनाम साहित्यिक, विचारवंत व राजनीतिज्ज्ञ आहेत.

'माती, पंख आणि आकाश' या त्यांच्या आत्मकथनाला गुजरात साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्याबद्दल राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याहस्ते त्यांचा पुण्यात सत्कार झाला. त्यावेळी मंत्री सामंत यांनी राज्यातील विविध महाविद्यालयात डॉ. मुळे यांची व्याख्याने आयोजित करावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यानुसार शिक्षण संचालक डॉ. माने यांनी ही सूचना केली आहे. लोकसेवा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल.

डॉ. मुळे यांच्या व्याख्यानाच्या आयोजनासंदर्भात पुणे येथील 'संवाद' संस्थेचे अध्यक्ष सुनील महाजन यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

पुढारी

**शिवाजी विद्यापीठ**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेण्यात भारतीय समाज कमी पडला, म्हणूनच देशाची प्रगती खुंटली, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

प्राचार्य कुंभार म्हणाले, बाबासाहेबांना 'बिटवीन द लाईन्स' वाचणे हा भागसुद्धा खूप महत्त्वाचा आहे. त्या दृष्टीने भारतीय समाजाने त्यांचे आकलन करवून घेणे आवश्यक आहे.

केंद्राचे संचालक डॉ. एस.एस. महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प वाहून अभिवादन केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. राजू श्रावस्ती, डॉ. सरदार सोनंदकर, डॉ. वाय.व्ही. धुपदाळे, आनंद खामकर उपस्थित होते.

पुढारी

# ग्रामीण बँकिंगमधील गोडबोले यांचे योगदान महत्त्वपूर्ण : प्रा. महाजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

पश्चिम महाराष्ट्रातील विकासाच्या प्रक्रियेत ग्रामीण बँकिंगमधील रा. ना. गोडबोले यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. रा. ना. गोडबोले यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त युनायटेड वेस्टर्न बँकेच्या रा. ना. गोडबोले अध्यासनाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी प्रास्ताविक केले. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. यावेळी केतकी कांबळे, दीप्ती भोसले, युवराज टिपुगडे, अनिकेत जाधव उपस्थित होते.

07 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**कोल्हापूर, ता. ६ :** भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६५ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्ह्यात ठिकठिकाणी, मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन, व्याख्यान, ग्रंथ प्रदर्शन, बुद्ध वंदनेच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. दिवसभर बिंदू चौक, महानगरपालिकेजवळील तसेच विविध ठिकाणच्या डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यास गर्दी होती.





१) कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात आयोजित अभिवादन सभेत बोलताना प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार. शेजारी डॉ. अविनाश भाले, डॉ. एस.एस. महाजन. २) जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीतर्फे डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे प्रल्हाद चव्हाण यांच्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले.





३) कोल्हापूर : राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी बिंदू चौक येथील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ४) जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना बालकल्याण संकुलमध्ये उपाध्यक्ष सुरेश शिपूरकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. सोबत कार्यवाह पद्मजा तिवले, अधीक्षक पी. के. डवरी, सचिन माने, द्रौपदी पाटील आदी.